आहे. समाजाचे एकत्रीकरण व लोकांच्या सर्व स्तरावरील सहभागातून (MOEF 2002 ) विकास प्रक्रियेतील पर्यावरणाच्या शाश्वतते बाबत हमी देण्याची गरज आहे. मात्र २००२ मधील डबल्युएसएसडी (WSSD) नंतर, शाश्वत विकासाठी राष्ट्रीय योजना तयार करण्याची प्रक्रिया व अंमलबजावणीची योजना तयार करण्यांत आली, ज्यातील मुख्य भाग नंतरच्या पंचवार्षिक योजनेमध्ये दिसून येतो. मानवी विकास व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संरक्षणाबात निश्चित केलेल्या व नियंत्रण योग्य उदिष्टांबाबत काही मुख्य निर्देशक निश्चित करुन शाश्वत विकासाप्रती शासनाची वचन बध्दता दिसून येते. जो सहाव्या पंचवार्षिक (२००२-२००७) योजनेचा भाग झालेला आहे. यु एन मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स अंतर्गत देशाच्या नियंत्रण योग्य विकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यांत आलेल्या दारिद्रयनिर्मुलनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यांत आले आहेत. या कार्यक्रमात सरकारने शाश्वत विकासासंबंधीच्या मुख्य तीन - सामाजिक, आर्थिक व पर्यावरण या आधारस्तंभाबाबत तयार केलेल्या योजना व कार्यक्रम याबाबत माहिती दिली आहे.

पर्यावरणाची हानी न करता आपल्या साधनसंपत्तीचा वापर चालू ठेवणे म्हणजेच साधनसंपत्तीचा चिरंतरशाश्वत वापर होय. साधनसंपत्तीचा वापर भारतीयांना नवीन नाही. वैदिक काळात ही पाणी, वन, प्राणी, जमीन व इतर अनेक प्रकारच्या सजीव – निर्जिव घटकांचा चिरंतर वापर कसा करावा याबद्दलचे संदर्भ उपलब्ध आहेत. जगभरात झालेल्या औद्योगिकरणामुळे चिरंतर विकासाचे महत्व अधोरेखीत झालेले आहे. सर्व देशांना त्याचे महत्व पटले असून त्यांनी त्यांच्या नियोजनात शाश्वत विकासाचा समावेश केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील याबाबतचा पहिला अहवाल club of Roman (क्लब ऑफ रोमने व त्या ”वाढीच्यामर्यादा” (limit of groth या नावाने प्रसिध्द झाला. या अहवालात साधन संपत्तीच्या अतिरिक्त वापरामुळे आपले भविष्य कसे अंधःकारमय, समस्या युक्त होऊ शकते यावर प्रकाश टाकण्यांत आला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरण कार्यक्रमातून (UNEP) जागतिक संवंर्धन धोरणाचा आराखडा तयार करण्यात आला. त्याचप्रमाणेWorld Wide Fund For Nature & International Union for Conservation(IUCN या कार्यक्रम प्रकल्पाव्दारे चिरस्थायी विकासाला जगभर चालना मिळाली आहे.

चिरंतर विकास प्रक्रियेनुसार विकास पुढील पिढीसाठी समृध्द व परिपूर्ण राहिल अशा दृष्टी कोनातून लक्ष केंद्रीत केले पाहिजे. मानवाची प्रत्येक पिढी ही संसाधनांचा विकास व -हास करीत असते. परंतु संसाधनाचा वेग विकासाच्या किती तरी अधिक प्रमाणांत आहे. विकास दर अशाच वेगात राहिल तर आर्थिक विकास थांबेल.

**पार्श्वभूमी:** विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये बदल अभिप्रेत असल्याने शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी जास्तीत जास्त बालक केंद्रीत पध्दतीचा वापर करणे गरजेचे आहे. अध्ययन अध्यापनामध्ये प्रकल्प पध्दती, क्षेत्र भेटी, संशोधन पध्दती, गटचर्चा, बुध्दीमंथन, प्रश्नोत्तरे ही पध्दती शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी आवश्यक आहे.

शहरीकरण वाढत असल्याने लोक प्रचंड प्रमाणात झाडे तोडतात. जग पैशाच्या मागे धावत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा -हास होत आहे. नैसर्गिक संपत्ती पेट्रोल, डिझेल प्रचंड प्रमाणात वापरतात. पुढील पिढीसाठी यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. पुढील पिढीसाठी या सर्वांचे संरक्षण होऊन पुढील पिढीसाठी ही संपत्ती टिकविणे आवश्यक आहे. त्यासाठी शाश्वत विकास अभिवृत्तीची मोठ्या प्रमाणांत गरज आहे.

**जागरुकता निर्माण करणे:**

शाळेत जाणारे विद्यार्थी ही भावी पीढी आहे. ज्यांना आपण रहातोय त्या जगाचा वारसा मिळेल. त्यांना शाश्वत विकासाबद्दल शिकवून, पर्यावरण संवर्धन, संसाधन व्यवस्थापन आणि इतर महत्वाच्या समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करु शकतो.

**कृतीला प्रोत्साहन:**

विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकास मूल्य रुजवुन त्यांना अधिक शाश्वत भविष्यासाठी कृती करण्यास प्रेरीत करता येते. विद्यार्थी कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे आणि उर्जा वाचविणे यासारख्या सवयी विकसित करु शकतात. ज्याचा दीर्घ काळांत पर्यावरणावर महत्वपूर्ण परिणाम होऊ शकतो.

**भविष्यातील नेत्यांची तयारी:**

आज जगाला ज्या शाश्वत विकासाच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. त्यांना नाविन्यपूर्ण आणि शाश्वत उपायांची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाविषयी शिकवून त्यांना भविष्यातील नेते बनण्यासाठी तयार करणे ही काळाची गरज आहे. जे अधिक शाश्वत जग निर्माण करण्यासाठी योगदान देऊ शकतात.

**अभ्यासक्रमाचे बळकटीकरण:**

शालेय अभ्यासक्रमांत शाश्वत विकास विषयांचा समावेश केल्यास ते विद्यार्थ्यांसाठी अधिक समर्पक बनू शकते. हा विषय त्यांना वास्तविक जगातील आव्हाने समजून समजुन घेण्यासाठी आणि भविष्यातील आव्हांनाना तोंड देण्यासाठी तयार करण्यात मदत करु शकतो.

**जागतिक उद्दिष्टे पूर्ण करणे:**

शाश्वत विकास ही केवळ स्थानिक समस्या नाही तर जागतिक समस्या आहे. शाश्वत वृत्ती विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून आपण संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उदिष्टे (SDGS) सारखी जागतिक स्थिरता उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योगदान देऊ शकतो.

एकंदरीत, शालेय विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाची वृत्ती निर्माण करणे अधिक शाश्वत भविष्य घडविण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांना शाश्वततेबद्दल शिकवून आणि कृती करण्यांस प्रेरीत करुन आपण पर्यावरण विषयी जागरुक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

व्यक्तींची पीढी तयार करु शकतो जी चांगल्या जगासाठी योगदान देऊ शकतात.

**सैध्दांतिक पार्श्वभूमी:**

प्रस्तुत संशोधन पेपर हे रुसोचा निसर्गवाद व कार्लमार्क्सच्या मार्क्सवादावर अधारीत आहे. रुसोच्या निसर्गवादानुसार शिक्षणाचे मुख्य ध्येय स्वातंत्र्य व स्वावलंबन आहे. तसेच शारदासंकुल या संस्थेचे मुख्य उद्देश शिक्षणातून स्वातंत्र्य, स्वावलंबन आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने शिक्षण देणे हे मुख्य उद्देश आहेत. शाश्वत विकासाचे शिक्षण मिळावे यासाठी शारदासंकुल मध्ये अनेक उपक्रम घेतले जातात व मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्याना शैक्षणिक अभ्यासक्रम निवडीचे स्वातंत्र्य आहे.शारदा संकुल हे शाश्वत विकास ध्येयांच्या अनुशंगाने प्रयत्नशील आहे.

**शीर्षक:**

शाश्वत विकासाची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी बारामती तालुक्यातील शारदासंकुल या संस्थेची भागीदारी

**महत्वाच्या संकल्पना:**

**अ) शाश्वत विकास:**

इंग्रजीमध्ये sustainable Developmentया शब्दासाठी शाश्वत, चिरंजीव, चिरंतर विकास असे शब्दा वापरले जातात. सध्याच्या पिढीला गरजांची पूर्तता भविष्यातील पिढीच्या गरजा भागविण्यासाठीच्या क्षमता आबाधित राखून करणे ही मानसिकता म्हणजे शाश्वत विकास. - (ढमढेरे एम.व्ही.२०२१)

**शाश्वत विकास व्याख्या -**

शाश्वतता म्हणजे एखादी अवस्था जी थोड्या किंवा अनंत काळापर्यंत टिकून राहते.

Sustainable हाशब्द Sustainable या लॅटिन शब्दापासुन तयार झाला आहे. Sustainable म्हणजे धरुन ठेवणे, सहनकरणे, सहाय्यकरणे, टिकवून ठेवणे, आयुष्याला हातभार लावणे. एखाद्या समाजाची सांस्कृतिक व आर्थिक अवस्था टिकून राहणे याला ही शाश्वतता म्हणतात किंवा पृथ्वीवरील नैसर्गिक स्त्रोतांचे (पर्यावरण -हासापासुन ) संरक्षण व संवर्धन करणे यालाही शाश्वतता म्हणतात. (ढमढेरे, 2021).

यु.सी.एन. (इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झरव्हेशन ऑफ नेचर ॲन्ड नॅचरल रिसोर्सेस ) या संस्थेने १९९१ मध्ये जाहीर केलेल्या शाश्वत जीवीताच्या धोरणात शाश्वतते ची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

शाश्वत म्हणजे सजीव, परिस्थिती किंवा नैसर्गिक स्त्रोतांचा असा वापर करणे जो भरुन काढला जाईल.

-(भोळे, 2021)

हर्मन डॅली या अर्थशास्त्रज्ञांनी शाश्वततेच्या पुढील कसोट्या सांगितल्या आहेत.

1) पूनर्निर्मिती क्षमस्त्रोताच्या निर्मितीचा वेग वापरापेक्षा जास्त असावा.

2) प्रदूषणाचा वेग पर्यावरणाच्या समावेशनाच्या क्षमतेपेक्षा जास्त नसावा. (मर्गे, 2021)

**ब) शारदा संकुल-**

महाराष्ट्रामध्ये पुणे जिल्ह्यातील बारामती शहराचे पश्चिमेला १७,४२,४०० चौ.फुट असणारे ठिकाण म्हणजे शारदासंकुल.

**उद्दीष्टे:**

शाश्वत विकासाच्या संदर्भात शारदासंकुलाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**शाश्वत विकासाची माहिती:**

सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विविधता असलेला तसेच क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा असलेला भारत हा विकसनशील देश आहे. भौगोलिक रचनेनुसार भारताला लांब किनारपट्टी लाभली आहे. भारतातील उपखंडामध्ये सुध्दा विविधता दिसून येते. येथे १० वेगवेगळे जैवभौगोलिक प्रदेश आढळतात. भारतात वाढत्या लोकसंख्या दरामुळे सामाजिक, आर्थिक विषमता दिसून येते. भरमसाठ व आटोक्यांत न येणा-या वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा -हास होत आहे. या सगळ्या गोष्टींचा पर्यावरणावर होणारा वाईट परिणाम हा अमर्याद काळ होतो. याचे परिणाम आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या सामाजिक घटकांवर दिसुन येतात तसेच पुढील पिढ्यांवर दिसून येतात.

शाश्वत वाढयावर उपाय म्हणून भारताने स्टॉकहोम येथे १९७२ मध्ये झालेल्या परिषदेमध्ये शाश्वत विकास ही संकल्पना स्वीकारली. १९९२ साली झालेल्या युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन एनव्हायरमेंट अँड डेव्हलपमेंट (United Nations Conference) (UNECD) या कॉंन्फरंन्स मध्ये भारताने १८७ देशांसोबत शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी रिओ करार केला.

१९९२ साली UNECD च्या झालेल्या व सुंधरा शिखर परिषदेत "शाश्वत विकासामध्ये शिक्षणाची असलेली भूमिका" महत्वाचा ठराव होता. (अजेंडा२१) शिक्षण हे शाश्वत विकास करण्यासाठी आवश्यक असणारे एक साधन आहे. शिक्षणामुळे जनतेमध्ये पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरुकता निर्माण होणे व पर्यावरणाचे संरक्षण होणे असे दोन फायदे होतात. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षणामुळे व शिक्षणामुळे लोक सक्षम होऊन सामाजिक व आर्थिक विषमता कमी होण्यांसमदत होते.

पर्यावरण विषयक समस्या व पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरुकते विषयक सर्व स्तरावर शिक्षण देण्यसाठी भारत सरकारने "मानव संसाधन विकास" मंत्रालयाची शिफारस केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020.2021 नुसार या मंत्रालयाचे नांव शिक्षण मंत्रालय (Education Ministry) असे झाले आहे.

युनेस्कोच्या डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या ५७ व्या सभेनुसार संयुक्तराष्ट्राने (UNESCO 2002) "शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी दशक २००५.२०१५" (DESD) अशी घोषणा केली व त्यामध्ये "शिक्षण हा शाश्वत विकास घडविण्यासाठी महत्वाचा घटक आहे" यावर भर देण्यांत आला. (शाश्वत विकास ध्येय –(कदम, 2021)

युनेस्को (२००४) च्या मतानुसार, शाश्वत विकासासाठी शिक्षण हे जरी औपचारिक असले तरी त्याचा रोजच्या व्यावहारीक व सामाजिक जीवनाशी संबंध येतो. शाश्वत विकास शिक्षणामुळे समस्या सोडविण्याच्या क्षमतेमध्ये

**शाश्वत विकासाची आवश्यकता:**

विकास हा मानवाचा नैसर्गिक हक्क आहे. या हक्काचा उपभोग घेतांना नैसर्गिक साधनांच्या अमर्यादित वापर केला जातो. त्यातून पर्यावरणाची अवनती होते. त्यांचा अनिष्ट परिणाम वर्तमान पिढीबरोबरच भविष्यातील पिढीवरही होत असतो. म्हणून विकासाच्या हक्काबरोबर नैसर्गिक कर्तव्य व जबाबदारीची जाणीव होणे गरजेचे आहे. ही जाणीव करुन देण्यासाठीच शाश्वत विकासाची नितांत आवश्यकता आहे. भारताच्या संदर्भात विचार केल्यास दारिद्रयनिर्मूलन करण्यासाठी, पर्यावरणीय प्रदूषण कमी करण्यासाठी, जीवनशैलीचे प्रारुप बदलण्यासाठी, आरोग्याचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी निसर्गाबरोबर जीवन जगण्यासाठी आणि म. गांधीच्या विचारातील स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करण्यासाठी शाश्वत विकासाची संकल्पना विकसित होणे आवश्यक आहे. सहकार्य व माहितीचे आदानप्रदानात वाढ होते.

**शाश्वत विकासासाठी शारदासंकुल या संस्थेचे योगदान:** पश्चिम महाराष्ट्रामध्ये बारामती मध्ये शारदानगर येथे यशस्वी प्रयोगभुमित शिक्षण क्षेत्रामध्ये शारदासंकुल या संस्थेने एका नविन प्रयेगाची सुरुवात झाली संस्थेचे संस्थापक आप्पासाहेब पवार यांनी दुरदृष्टी व समाजहिताचा व्यापक ध्येयवाद डोळयासमोर ठेवून शारदासंकुल या संस्थेची स्थापना केली. सहकारातुन शिक्षणाकडे जाण्याचा मार्ग दाखविला. कृषिरत्न शरद पवार यांनी घालून दिलेला उज्वल शिक्षणाचा वारसा सस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब पवार यांनी अतिशय समर्थमपणे पुढे नेत संस्थेला एक नामांकित शिक्षण संस्था म्हणुन देशपातळीवर नामांकन प्राप्त करुन दिलेले आहे. संस्थेने सकारात्मक दृष्टीकोन समोर ठेवून ग्रामीण विकासाचा सतत पाठपुरावा केला. ग्रामिण विकासासाठी संस्था काय करु शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे अग्रीकल्चर डेव्हलमेंट ट्रस्ट शिक्षणसंस्था शारदासंकुल, संस्थेने आपले संकल्प विचार व कृषि ग्रामीण विकासाशी एकरुप केले आहेत. शाश्वत विकासाच्या 17 ध्येयांपैकी प्रस्तुत संशोधन लेखातत ध्येय क्रमांक 11 शाश्वत शहरे व समुदाय आणि ध्येय क्रमांक 17 ध्येयासाठी भागिदारी या दृष्टीने विचार केला आहे. व त्या अनुषंगाने शारदा संकुल या संस्थेची पाहणी केली आहे.

'सर्वासाठी शिक्षण' हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य सुत्र आहे. याच सुत्राचा पाठपुरावा करणारी पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील विस्तारलेले शारदासंकुल ही ग्रामीण शिक्षणसंस्था आहे. ग्रामीण समाज अर्थिक व सामाजिक स्तरावर स्वयंमपूर्ण

व स्वावलंबी करावयाचा असेल तर शेतकरी, शेतमजुर व अपेक्षित घटकातील प्रत्येकाला दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. हा विचार डोळ्यासमोर ठेवून आप्पासाहेब पवार यांनी अग्रीकल्चर डेव्हलपमेंट शिक्षणसंस्था शारदासंकुल स्थापना केली. संस्थेने स्थापनेपासुनच प्रयोगशिलता, शाश्वत विकास केंद्रस्थानी ठेवुन कला सुसंगत शैक्षणिक उपक्रमामधून स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान देशाच्या शैक्षणिक नकाशावर निर्माण केले आहे.

**शाश्वत विकासासाठी शारदासंकुलचे उपक्रम:**

| अ.नं. | शाश्वत विकासाचे क्षेत्र | उपक्रम | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | पाणी व पाण्याचे उपयोग या विषयी शाश्वत विकास दृष्टीकोन | 1) रेनहार्वेस्टींगव्दारे पाण्याची बचत व त्याव्दारे भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. | परिसरातील कृषि क्षेत्राशी निगडीत व्यक्ती |
| २ | टाकाऊ पासून टिकाऊ या विषयी शाश्वत विकास दृष्टीकोन | 2) बंनगीखत – बाजरीचे उत्पादन घेऊन जे रॉ मटेरियल राहते त्यापासुन बनगी खत तयार केले जाते. हे बनगी खत लिंबु उत्पादनासाठी उपयोगात आणले जाते. | परिसरातील लघु उत्पादनाशी संबंधीत व्यक्ती |
| ३ | लघु उत्पादनाविषयी शाश्वत विकास दृष्टीकोन | 3) सुतळीपासुन विविध प्रकारच्या वस्तु बनविणे उदा. कडधान्य भरण्यासाठी छोटी पोती, पिशव्या इत्यादी बनविले जाते.<br>अ) काथ्यापासून चटई, पायपुसणी, शोच्या वस्तु इत्यादी बनविले जाते.<br>ब) काथ्यापासून शेतक-यांचे जनावरांसाठी कासरा बनविला जातो. | परिसरातील लघु उत्पादनाशी संबंधीत व्यक्ती |

निष्कर्ष – अशाप्रकारे शारदासंकुल हे समुदायाचा व परिसराचा शाश्वत विकास होण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

*Best.J.W,&Kahn.J.V. (2008) Research in Education, New Delhi: Prentice Hall India Pvt. Ltd.*

*Sandhya R. P. (1996) Personality Characteristics and scientific Attitude (A Study of Science Teaching), Udaipur: Shiva Publishers Distributors*

*आगलावे, प्र.ना. (2000), संशोधन पध्दतीशास्त्र. पुणे :विद्याप्रकाशन.*

*कदम, पी.एस. (2021),शाश्वत वकास ध्येय. भोपाळ : नित्या पब्लिकेशन्स.*

*घोरमोडे, के.यु.,घोरमडे कला, (2008), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, पुणे : विद्याप्रकाशन*

*ढमढेरे, एस.व्ही. (2021),शाश्वत विकास आणि भारत, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.*

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

*मुळे, रा.श., उमाठे, वि.तु.(1997), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे. नागपूर : महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ*

*पंडीत, बन्सी.बिहारी.,महाले,संजिवनी. (2015), संशोधन. पुणे : युनिक पब्लीकेशन*

**वेबसाईट:**

*https//www.loksatta.co*

*https//www.dompsc.com.Environment*

*https//www.springer.com*

*youtube.com*

*https//www.youtube.com*

*https://mr.wikipedia.org/s/1c1y*

***Cite This Article:***

**कु. पाडळे मि. ना व प्रा. शिरोडे सं. (2024).** *शाश्वत विकासाची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी बारामती तालुक्यातील शारदासंकुल या संस्थेची भागीदारी.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 154–161). **ERJ.** ***https://doi.org/10.5281/zenodo.10906238***